माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

---

तक्रार क्रमांक– १२५०+१२५१+१२६५ /२०२४ /पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलिय अधिकारी तथा |
| रमेश विष्णु खामकर | जन माहिती अधिकारी आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे | आरोग्य अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे |

**( निर्णय दिनांक- ०६.०६.२०२५ )**

तक्रारदार यांचे कलम-१८ अंतर्गत ३ तक्रार अर्ज दिनांक ३०.०९. २०२४ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झाले आहेत. तक्रारदार यांनी आयोगाचा आदेश पारित होऊन आदेशाची अमलबजावणी झाली नाही अशा आशयाची तक्रार केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे आणि त्यानुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणानी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(९) नुसार राज्य माहिती आयोग, तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

सदर तक्रार अर्जाशी संबंधित व्दितीय अपील क्रमांक १८३४+१६१४+१८३३/२०१९ पुणे यामध्ये आयोगाने दिनांक १९.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केले आहेत .

प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर प्रकरणात विद्यमान जन माहिती अधिकारी आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांना सूचीत करण्यात येते की त्यांनी सदरचे आदेश प्राप्त होताच वर नमूद द्वितीय अपिलांमध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार १५ दिवसात कार्यवाही करावी व तसे तक्रारदार यांना कळवावे.

**आदेश**

वरील निर्देशासह तक्रारदार यांचे ३ तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक– १२५०+१२५१+१२६५ /२०२४ /पुणे 8450/2025 दिनांक- 19/6/2025